# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालय.

**वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली-442605 (महाराष्ट्र)**

दुरध्वनी क्र. 07132-233184 फॅक्स क्र. 07132-233187 Email-ccftgadchiroli@maforest.gov.in


क्रमांक कक्ष-3(1)/तेंदु/विक्री/ 2051 गडचिरोली, दिनांक :- 19/09/2025

प्रति,

उप वनसंरक्षक,
आलापल्ली/भामरागड/गडचिरोली/सिरोंचा/गडचिरोली, वनविभाग.

विषय :- माहे ऑक्टोंबर/2025 करीता इमारती माल, जळाऊ बिटे व लांब बांबू वनोपजाचे लिलावाचे आयोजन करणे बाबत.

संदर्भ :- 1) मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-1(1)/विक्री/25-26./843 दि. 06.06.2025
2) मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-1(1)/विक्री/25-26./965 दि. 23.06.2025

चंद्रपूर व गडचिरोली वनवृत्तातील वनोपजाचे लिलावाकरीता एकसुत्रता राहावी व दोन्ही वनवृत्तासाठी जास्तीत जास्त दिवस उपलब्ध व्हावेत या उद्देशाने मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर वनवृत्त यांनी संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये दिनांक 12.06.2025 रोजी व्ही.सी. द्वारे सभा घेवून संदर्भ पत्र क्र. 2 प्रमाणे गडचिरोली व चंद्रपूर वनवृत्ताकरीता लिलाव तारखा निश्चीत केलेल्या आहेत.

त्यानुसार गडचिरोली वनवृत्तातील इतर किसम इमारती करीता दिनांक 1 ते 10 व 29, 30/31 व साग इमारती करीता दिनांक 11 ते 19 अशा तारखा मंजुर केलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे मंजुर तारखानुसार माहे ऑक्टोंबर/2025 या महिण्यात इमारती मालाचे ई-लिलाव साठी (दिनांक 5, 12 व 19 रवीवार व 2 म. गांधी जयंती / दसरा असे शासकिय सुट्टीचे दिवस वगळुन) खालीलप्रमाणे विभागनिहाय लिलाव तारखा आवंटीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वनविभाग | इतर किसम इमारती करीता | साग इमारती करीता | जळाऊ बिटे व बांबू करीता |
|---|---|---|---|---|
| 1 | वडसा | दि. 1 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 11 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 11 ऑक्टोंबरपुर्ण दिवस |
| 2 | गडचिरोली | दि. 3 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 13 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 13 ऑक्टोंबर पुर्ण दिवस |
| 3 | आलापल्ली | दि. 9 व 10 आणि 29, 30 व 31 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 14 व 15 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 9 व 10 आणि 29, 30 व 31 ऑक्टोंबर पुर्ण दिवस (जळाऊ) व 15 ऑक्टोंबर बांबू |
| 4 | सिरोंचा | दि. 6, 7 व 8 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 16 व 17 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 16 व 17 ऑक्टोंबर पुर्ण दिवस व 16 ऑक्टोंबर बांबू |
| 5 | भामरागड | दि. 4 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 18 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. 4 ऑक्टोंबर पुर्ण दिवस |

वरीलप्रमाणे तारखांनुसार आपले वनविभागातील इमारती माल वनोपजाचे ई-लिलावाचे आयोजन करतांना दिनांक 1 एप्रिल/2025 पासुन दररोज सकाळी 9.00 वा. ते सायंकाळी 6.55 वा. पर्यंत प्रति बॅच 6 लॉट याप्रमाणे प्रति दिवस 1070 लॉटस् लिलावात ठेवावयाचे आहेत. तरी लिलाव नियमानुसार लिलाव तारखेच्या 8 दिवसापुर्वी लिलावाकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व फोटोग्राफ एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग यांचेकडे सुपूर्द करावे. विहीत वेळेत सदरची माहिती प्राप्त न झाल्यास त्या तारखेचा लिलाव रद्द करण्यात येईल याची नोंद / दक्षता घ्यावी. करीता माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

(एस. रमेश कुमार)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
गडचिरोली

प्रतिलीपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित